# १७. थेंब आज हा पाण्याचा



• ऐका. वाचा. म्हणा.

शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे, विषय आहे गाण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।धृ.।।

मोती बनुनी सरसर येती, वर्षेमधल्या सरीतुनी
माळ ओवते, निसटुन जाते, बावरते जणू परी कुणी
या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जीण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।१।।


आभाळातिल ह्या मोत्याने, मातीमधुनी पिकती मोती
निसर्ग जाणी मोल तयाचे, तुम्ही माणसे का मग कोती ?
संचय करता तिजोरीतल्या, खणखणत्या त्या नाण्यांचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।२।।

कशास ऐसा वेडाचाळा, स्वत: होऊनी ठगण्याचा
दृष्टिकोन तू बदल आता रे, निसर्गास ह्या बघण्याचा
तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा ?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।३।।

**सुनंदा भावसार** (१९५९) : नियतकालिकांतून पर्यावरणविषयक कवितांचे लेखन. विविध कार्यक्रमांतून पर्यावरणविषयक कवितांचे सादरीकरण. 'पर्यावरण गीत गंगा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवयित्रीने मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व विशद केले आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. कवयित्रीने असे का म्हटले असावे ते तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) या मोत्यांचा (पाण्याचा) संचय कर.

(आ) निसर्गाला जे कळते ते माणसाला कळत नाही.

**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.**

(अ) आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या थेंबाने धान्य पिकते.

(आ) मनुष्य खणखणत वाजणाऱ्या नाण्यांचा तिजोरीत संग्रह करतो.

(इ) निसर्गाचे मोल न जाणणे हे स्वत:ला फसवण्यासारखे आहे.

**प्र. ३. संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) आभाळातील मोती.

(आ) मातीतील मोती.

(इ) मोत्यांचा संचय.

(ई) बहुमोल थेंब.

**प्र. ४. खाली दिलेल्या ओळींतील विचार सांगा.**

तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा ?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।

**प्र. ५. माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

**प्र. ६. फरक स्पष्ट करून तक्ता पूर्ण करा.**

| | माणसाचे धन | निसर्गाचे धन |
|---|---|---|
| कोणते ? | | |
| कोठे ठेवतात ? | | |
| उपयोग | | |

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

उदा., मोल–बहुमोल, अनमोल.
मोल–मातीमोल, कवडीमोल.

**(आ) माती–मोती अशा शब्दांच्या अर्थात केवळ एका मात्रेमुळे खूप फरक होतो. अशा शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**प्रकल्प :**

(१) सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या दुतर्फा पाणीबचतीच्या संदर्भात आपल्यासाठी काही संदेश लिहिलेले असतात. त्यांचा संग्रह करा. त्यांतील तुम्हांला आवडलेल्या संदेशांचे फलक तयार करून शाळेच्या परिसरात लावा.

(२) 'निसर्ग वाचवा' याविषयी घोषवाक्ये तयार करून खालील फलकांवर लिहा.



## लिहिते होऊया.

- **पाऊस पडलाच नाही, तर..... कल्पना करा. खालील मुद्द्यांच्या आधारे निबंधलेखन करा.**
  (१) पाण्याचा दुष्काळ.
  (२) दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम.
  (३) शेती व उद्योगधंदे यांच्यावर होणारा परिणाम.
  (४) नदी, नाले, विहिरींची स्थिती.
  (५) सजीवांवर होणारा परिणाम.



## विचार करा. सांगा.

- **पाणी कसे तयार होते?**
- **पाणी कोठे साठवले जाते?**
- **पाण्याचा वापर कशाकशासाठी होतो?**
- **जलप्रदूषण म्हणजे काय?**
- **जलप्रदूषणाची कारणे कोणती?**
- **जलप्रदूषण रोखण्यासाठी काय करावे, असे तुम्हांला वाटते?**
- **जलसंवर्धनासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल?**

**वाचा.**
**लक्षात ठेवा.**

- **पाणी फेकून देऊ नका.**
- **पाणी हवे तेवढेच वापरा.**
- **पाण्याचा पुनर्वापर करा.**
- **जवळच्या धरणाला भेट देऊन धरणाचा उपयोग समजून घ्या.**
- **पाणी घेतल्यानंतर नळ लगेच बंद करा.**

**'पाणी अडवा, पाणी जिरवा.'**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या विषयांवर आधारित घोषवाक्ये, सूचना सुवाच्य अक्षरांत लिहून घ्याव्यात. वर्गात किंवा शाळेच्या परिसरात लावाव्यात.

# आभारपत्र

- **सुमितच्या शाळेत १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचे आयोजन करण्यात आले होते. सुमित पडवळ शाळेतील सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. बालदिनाच्या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. हेमंत साळवे (प्राचार्य) यांचे आभार मानण्यासाठी सुमितने त्यांना पत्र पाठवले आहे. ते अभ्यासा.**

सुमित पडवळ
विद्यावर्धिनी विद्यालय
उस्मानाबाद,
पिन – ४१३५०१
दिनांक : १५.११.२०२२

**प्रति,**

डॉ. हेमंत साळवे
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय,
उस्मानाबाद.
पिन – ४१३५०१

आदरणीय महोदय,

स. न. वि. वि.

१४ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या निमित्ताने आमच्या शाळेच्या कार्यक्रमासाठी आपण वेळात वेळ काढून उपस्थित राहिलात व आम्हां सर्व मुलांना मार्गदर्शन केले, याबद्दल सांस्कृतिक विभाग व शाळेच्या वतीने मी आपले आभार मानत आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपण पंडित जवाहरलाल नेहरू व विद्यार्थी यांच्याबद्दल अनेक कथा सांगितल्या. त्या कथा आम्हां सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडल्या. तसेच विद्यार्थी कसा असावा, याबाबतही आपण मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून आम्हांला निश्चितच नवी दिशा मिळाली आहे.

खरे तर आपला रोजचा दिवस कामांमध्ये अत्यंत व्यस्त असतो, त्यातूनही वेळ काढून आपण कार्यक्रमास उपस्थित राहिलात, याबद्दल आपले पुनश्च मनापासून आभार.

आपला नम्र,
सुमित पडवळ
(सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी)

- **जर तुम्हांला एखाद्या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करायचे असेल, तर कोणत्या गोष्टी विचारात घ्याल, त्याचे सादरीकरण कसे कराल, त्याचा आराखडा तयार करा.**
- **आंतरशालेय क्रीडामहोत्सवात धावण्याच्या स्पर्धेत तुमच्या मित्राने/मैत्रिणीने प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

## आपण समजून घेऊया.

- **खालील तक्त्याचे निरीक्षण करा. शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | कः |
| – | । | ि | ी | ु | ू | े | ै | ो | ौ | ं | : |

मराठी वर्णमालेचा म्हणजे अक्षरांचा अभ्यास तुम्ही केला आहे. त्या अक्षरांचा वापर करून आपण शब्द लिहितो हे तुम्हांला माहीत आहे. आपण जे बोलतो ते शब्द ध्वनींनी बनलेले असतात. अक्षरे म्हणजे या ध्वनींसाठीची चिन्हे असतात.

ध्वनींचे दोन प्रकार असतात– स्वर आणि व्यंजने. आता आपण मराठी भाषेतील स्वर आणि व्यंजने पाहणार आहोत.

मराठीत अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर आहेत. अलीकडे मराठीत इंग्रजी शब्दांचा वापर सुरू झाल्यामुळे अॅ, ऑ या स्वरांचाही समावेश करण्यात आला.

'लृ' हा स्वर मराठीत फारसा वापरला जात नाही.

क्, ख्, ग्, घ्, ङ्

च्, छ्, ज्, झ्, ञ

ट्, ठ्, ड्, ढ्, ण्

त्, थ्, द्, ध्, न्,

प्, फ्, ब्, भ्, म्

य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, ळ् ही व्यंजने आहेत.

क्ष, ज्ञ ही संयुक्तव्यंजने आहेत.

प्रत्येक ध्वनीसाठी एकच अक्षर असते असे तुम्हांला वाटते का? एका अक्षराचा एकच उच्चार होतो का?

- हे शब्द उच्चारून पाहा.

चंद्र चांदणे

आजी आजोबा

झाड झकास

असे आणखी शब्द मिळवा.